# पाणी उपसा साधने (पंप संच) व पाईप (एच.डी.पी.ई./पी.व्ही.सी.)

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी यापूर्वी विविध योजनामधून अनुदानावर संरक्षित सिंचन सुविधा राबविण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. सद्यस्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता व शेतक-यांकडे पिकास संरक्षित सिंचन देणेकरिता व्यवस्था निर्माण करण्यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संरक्षित सिंचनाकरिता पाण्याची उपलब्धता या उपघटकांतर्गत पाणी उपसा साधने (पंप संच) व पाईप (एच.डी.पी.ई./ पी.व्ही.सी.) हे वैयक्तिक लाभाचे घटक राबविणे प्रस्तावित आहे.

**उद्दिष्टे:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गावसमुहातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. पाणी उपसा साधनांचा वापर करून सिंचनाची सोय करणे व कार्यक्षमता वाढविणे.

**लाभार्थी निवडीचे निकष:**

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.
२. ज्या शेतकऱ्याकडे सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे, परंतु पाणी उपसा साधना अभावी पिक उत्पादनात घट येते अशा शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.
३. पाणी उपसा साधने उपलब्ध असलेले तसेच या घटकाचा इतर कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना लाभ देय नाही.

**अर्थसहाय्य:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी उपसा साधने अंतर्गत विद्युत पंप संच /डिझेल इंजिन व पाईप साहित्य घटकासाठी अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | घटक | अनुज्ञेय अनुदान (रु.) |
|---|---|---|
| **अ.** | **पाणी उपसा साधने (पंप संच)** | |
| १. | विद्युत पंप (५ एच पी पर्यंत) | किमतीच्या ५०%, जास्तीत जास्त रु. १००००/- |
| २. | डिझेल इंजिन (५ एच पी पर्यंत) | |

| ब. | पाईप पुरवठा (६०० मी.) | |
|---|---|---|
| १. | एच डी पी ई | किमतीच्या ५०%, जास्तीत जास्त रु. १५०००/- |
| २. | पी व्ही सी | |

संदर्भ: जा.क्र.कृआ/विप्र.१/राअसूअ-१६१७/मासू/ प्र.क्र.१०/२११/१६ दिनांक ३१/०५/२०१६, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, २०१६-१७ मार्गदर्शक सूचना

मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानूसार निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार साहित्य असणे आवश्यक आहे.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-**

**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर समूह सहाय्यकाच्या मदतीने नोंदणी करून अर्ज करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावीत.
२. मार्गदर्शक सूचनानुसार दिलेल्या तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्य खरेदी करणे बंधनकारक राहील.
३. लाभार्थ्याने आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.
४. निवडलेल्या लाभार्थींना त्यांच्या पसंतीनुसार सेवा पुरवठादार संस्थांकडून पंप संच व पाईप खरेदी करण्याची मुभा राहणार आहे.
५. साहित्य प्रकल्प स्थळी पुरवठा झाल्यानंतर आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित करावीत व ऑनलाईन अनुदान मागणी करावी.
६. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी ऑनलाईन पूर्वसंमती दिल्यानंतर घटकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी- मांडणी व जोडणी करावी. सेवा पुरवठादार संस्थेकडील बिले शेतकऱ्यांने स्वत:ची स्वाक्षरी करून ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

**ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज प्राप्त करून सर्व अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला शेतकरी, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.
२. इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन प्राप्त अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने अपलोड केलेल्या कागदपत्राची छाननी करुन अर्जांची अत्यल्प व अल्प भूधारक अशी प्रवर्गनिहाय अनु.जाती/अनु. जमाती/दिव्यांग/महिला शेतकरी/इतर सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने वर्गवारी करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, ८-अ, यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय? या बाबतचा तपशिल, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अ.जाती, अ.जमाती शेतकऱ्यांसाठी) आहे काय?, इत्यादी सर्व अनुषंगीक बाबींची पडताळणी करावी.
२. पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तसेच ८-अ मध्ये नमूद सर्व गट/सर्वे नं. मध्ये पाहणी तपासणी सूचीनुसार करुन पाण्याची उपलब्धता, पाणी उपसा संच व इतर बाबी आहेत/नाहीत याबाबत तपासणी करावी असल्यास याबाबतचा तपशील नमूद करावा आणि नियोजित प्रकल्प स्थळ व लाभार्थी सदर घटकासाठी पात्र आहे किंवा नाही याबाबतचा स्थळ पाहणी अहवाल प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थानांकन (Geo Tagging) करून उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन अपलोड करावा.
३. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यास इतर अथवा या योजनेतून शासकीय अनूदान घेतले असल्या/नसल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची खात्री करून ही बाब प्रकल्प मंजूरीसाठी सादर करताना उपविभागीय कृषि अधिकारी यांना अवगत करावी.
४. लाभार्थी शेतकऱ्यांने साहित्य प्रकल्प स्थळी पुरवठा झाल्याचे ऑनलाईन कळविल्यानंतर संबंधित कृषि सहाय्यक यांनी साहित्य मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तांत्रिक दर्जाचे असल्याबाबत ऑनलाईन मोका तपासणी करावी. प्रकल्प स्थळ व लाभार्थीचे नैऋत्य कोपरा बाजूवरुन अक्षांश/रेखांशसह भौगोलिक स्थानांकन (Geo Tagging) करून तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे ऑनलाईन अपलोड करावा.
५. अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी राबविलेल्या घटकाची २५% तपासणी करावी. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करून तपासणी अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. सर्व शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छाननी, ग्राम कृषि संजीवनी समितीची मान्यता व स्थळ तपासणी अहवाल विचारात घेवून अर्जाच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा व अपात्र असल्यास लाभार्थीस कारणासहित अवगत करावे.
२. अर्ज सादर केलेल्या पात्र शेतकऱ्यांस ऑनलाईन पूर्वसंमती द्यावी.
३. लाभार्थी शेतकऱ्याने ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांचेकडून तपासणी पूर्ण करून घ्यावी.
४. शेतकऱ्यास ऑनलाईन पूर्वसंमती देतांना पूर्वसंमती पत्रासोबत खरेदीची प्रक्रिया व देय अनुदान याबाबत अवगत करावे.
५. अनुदान प्रस्ताव, प्रथम (मोका) व अंतिम तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पासाठीचे कृषि पर्यवेक्षक यांनी अनुदान प्रस्ताव तपासून अनुदान अदायगीसाठी ऑनलाईन शिफारस करावी.
६. पात्र लाभार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यावर DBT द्वारे अनुदान अदायगी करण्यास मंजुरी दयावी.

७. उपविभागांतर्गत राबविलेल्या घटकांपैकी ५% लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी:-**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.

२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी. व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ___________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) __________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. _______ |
| ६. | बाब | (विद्युत पंप संच /डिझेल इंजिन) / पाईप साहित्य |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | उत्पादकाचे नाव | |
| ९. | वितरकाचे नाव | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. प्रकल्प क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _______<br>२. विद्युत पंप संच /डिझेल इंजिन------------------<br>३.पाईप साहित्य-<br>व्यास-----------------<br>प्रकार----------------- |
| ११. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली | होय/नाही |

| | | |
|---|---|---|
| | आहे काय ? | |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १३. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १५. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव..................)**